International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 | Impact Factor – 8.141
Peer Reviewed | Bi-Monthly
Vol. 7 No. 15 | January – February - 2026

# महिला उद्योजकतेच्या संदर्भात नाशिक जिल्ह्यातील भोजनालय व्यवसायातील महिलांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास

**शितल सुकदेव मोरे[1], डॉ. सुरेश श्रावण पाटील[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी, महात्मा गांधी विद्यामंदिर, संचलित कला विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय मनमाड.*

*[2]मार्गदर्शक, एस एन जे बी एस, कला वाणिज्य, आणि विज्ञान, महाविद्यालय, चांदवड*

*Corresponding Author – शितल सुकदेव मोरे*

**DOI - 10.5281/zenodo.18864188**

**गोषवारा:**

*महिला उद्योजकता ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची सामाजिक व आर्थिक संकल्पना आहे. पूर्वी महिला मुख्यतः घरगुती कामांपुरत्या मर्यादित होत्या; परंतु शिक्षण, औद्योगिकीकरण, शहरीकरण व सरकारी धोरणांमुळे महिलांनी व्यवसाय क्षेत्रात प्रवेश केला. स्वतःचा व्यवसाय सुरू करून तो यशस्वीपणे चालवणारी महिला म्हणजे महिला उद्योजक होय. महिला उद्योजकतेमुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढून समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली आहे. भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये उद्योजक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे.तसेच नाशिक जिल्ह्यातील अनेक महिला आपल्या पारंपारिक किचन कौशल्यावर आधारित भोजनालय, डीनर पॉइंट, कॅफे, टिफिन अश्या अनेक सेवा करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. नाशिकसारख्या शहरांमध्ये रेस्टॉरंट इंडस्ट्री मध्ये महिला उद्योजिकांची संख्या वाढली आहे आणि त्या व्यवसायातून महिला ही आर्थिक सक्षमीकरणाकडे वळत आहे. नाशिक जिल्ह्यातील भोजनालय (हॉटेल, खानावळ, मेस, कॅन्टीन इ.) चालविणाऱ्या महिलांचा आर्थिक व सामाजिक दर्जा, त्यांना येणाऱ्या अडचणी, अनेक आहे परंतु महिला येणाऱ्या अडचणीवर मात करून येणाऱ्या संधी, शासनाच्या योजना व त्यांच्या जीवनावर उद्योजकतेचा झालेला परिणाम यांचा अनुभव घेऊन महिलांच्या उत्पन्नात वाढ, निर्णयक्षमतेत सुधारणा, सामाजिक प्रतिष्ठा व आत्मविश्वास वाढल्याचे दिसून येते. तथापि भांडवलाची कमतरता, कर्जप्रक्रियेतील अडचणी, कुटुंबीयांचा अपुरा पाठिंबा व बाजारातील स्पर्धा या समस्या अजूनही कायम आहेत.*

**प्रस्तावना:**

आजच्या बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत महिलांची भूमिका केवळ गृहिणीपुरती मर्यादित न राहता ती उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्वतःचा उद्योग सुरू करून तो यशस्वीपणे चालविणे. मग महिला अनेक वेगवेगळया व्यवसायात मोठ्या प्रमाणात कामगिरी बजावत आहे तो व्यवसाय कोणताही असो सुरुवातीला महिला कमी भांडवलात व्यवसायाला सुरुवात करतात कमी भांडवल लागणार व्यवसाय हा भोजनालय व्यवसाय आहे हा तुलनेने इतर व्यवसायापेक्ष्या कमी भांडवलात सुरू होणारा, स्थानिक गरजांवर आधारित व महिलांसाठी अनुकूल मानला जाणारा व्यवसाय आहे. नाशिक जिल्हा हा धार्मिक, औद्योगिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा असल्यामुळे येथे भोजनालय व्यवसायाला मोठी संधी उपलब्ध आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील भोजनालय चालविणाऱ्या महिलांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

भारतात महिलांना पारंपरिकरित्या गृहिणीची भूमिका दिली गेली होती. मात्र शिक्षण, शासकीय योजना, स्वयंरोजगाराच्या संधी आणि सामाजिक बदल यांमुळे

महिलांचा व्यवसाय क्षेत्रातील सहभाग वाढू लागला आहे. महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्वतःच्या प्रयत्नातून व्यवसाय सुरू करून आर्थिक स्वावलंबन मिळवणे होय. नाशिक जिल्हा हा औद्योगिक, कृषी आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा असून येथे भोजनालय व्यवसायाला मोठी संधी आहे. अनेक महिलांनी घरगुती कौशल्याचा उपयोग करून लहान-मोठी भोजनालये सुरू केली आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील भोजनालय चालविणाऱ्या महिलांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. नाशिक जिल्ह्यातील भोजनालय व्यवसाय चालवणाऱ्या महिला उद्योजकांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.
2. भोजनालय व्यवसायामुळे महिलांच्या उत्पन्नात, बचतीत व आर्थिक स्वावलंबनात झालेले बदल अभ्यासणे
3. महिला उद्योजकांच्या सामाजिक दर्जात, आत्मविश्वासात व कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.
4. भोजनालय व्यवसाय चालवताना महिला उद्योजकांना येणाऱ्या आर्थिक, सामाजिक समस्याचा अभ्यास करणे.
5. भोजनालय व्यवसायातून महिला उद्योजकांकडून निर्माण होणाऱ्या रोजगार संधींचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके:**

1. भोजनालय व्यवसायामुळे महिला उद्योजकांच्या उत्पन्नात हळूहळू वाढ झालेली दिसून येते.
2. महिला उद्योजकांच्या व्यवसायमुळे महिलामध्ये आत्मविश्वास वाढला व सकारात्मक बदल झाला आहे.
3. महिला उद्योजकांचा कुटुंबातील आर्थिक व सामाजिक निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढलेला आहे.

**संशोधनाची गरज:**

अलीकडच्या काळात महिला उद्योजकतेला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्व प्राप्त झाले आहे. महिलांचा व्यवसायातील सहभाग हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक मानला जातो. तसेच अनेक क्षेत्रात विशेषतः भोजनालय व्यवसाय चालवणाऱ्या महिलांवर आधारित अभ्यास तुलनेने कमी आढळतो. त्यामुळे या क्षेत्रातील महिला उद्योजकतेचा सखोल अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**संशोधन पद्धती:**

"नाशिक जिल्ह्यातील भोजनालय चालविणाऱ्या महिलांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास" या विषयावर आधारित असून या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश नाशिक जिल्ह्यातील भोजनालय व्यवसायात कार्यरत असलेल्या महिलांची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थान, उद्योजकीय सहभाग तसेच त्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी यांचा सखोल अभ्यास करणे हा आहे. या संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र नाशिक जिल्हा असून जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील भोजनालय व्यवसाय चालविणाऱ्या महिला उद्योजकांचा समावेश करण्यात आलेला आहे. संशोधन अधिक वास्तवाधारित व केंद्रित व्हावे या दृष्टीने भौगोलिक मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या संशोधनाची लोकसंख्या म्हणजे नाशिक जिल्ह्यातील सर्व भोजनालय व्यवसाय करणाऱ्या महिला उद्योजक होत. माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या माहितीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावली व प्रत्यक्ष मुलाखतीचा आधार घेण्यात आला आहे. या माध्यमातून महिलांची वैयक्तिक माहिती, व्यवसायाची स्वरूप, उत्पन्न,

खर्च, बचत, सामाजिक दर्जा तसेच व्यवसाय करताना येणाऱ्या समस्या यासंबंधी माहिती गोळा करण्यात आली आहे. दुय्यम माहिती पुस्तके, संशोधनात्मक नियतकालिके, शासकीय अहवाल, संकेतस्थळे व पूर्वीचे संशोधन प्रबंध यांच्या माध्यमातून संकलित करण्यात आली आहे.

**महिला उदोजक व्यवसायाचा आर्थिक अभ्यास:**

आजच्या काळात महिलांचा आर्थिक सहभाग समाजातील विकासासाठी खूप महत्त्वाचा ठरतो. महिला फक्त घरातील व्यवस्थापिका नाहीत, तर व्यवसाय, उद्योग, शिक्षण, सेवा क्षेत्र आणि इतर आर्थिक क्षेत्रातही सक्रिय सहभागी बनत आहेत. समाजातील आर्थिक संतुलन राखण्यासाठी महिलांची आर्थिक सक्षमता आणि स्वावलंबन महत्त्वाचे आहे. नाशिक जिल्ह्यातील महिला उद्योजक विशेषतः लहान-मध्यम व्यवसायात, जसे की भोजनालय चालवणे, खूप सक्रिय आहेत. अशा व्यवसायात त्यांना विविध आर्थिक व सामाजिक अडचणींचा सामना करावा लागतो. महिलांचा व्यवसाय फक्त आर्थिक उत्पन्नाचा स्रोत नाही तर त्यांच्या आत्मविश्वास, निर्णय क्षमता आणि सामाजिक प्रतिष्ठेचा मार्गही आहे. महिला उद्योजकतेचा अभ्यास करून त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा, व्यवसायातील अडचणींचा, उत्पन्न आणि खर्च यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच, या अभ्यासाद्वारे महिलांना आवश्यक आर्थिक सहाय्य, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कोणत्या प्रकारचे दिले जाऊ शकते, हे समजून घेणे शक्य होते. हा अभ्यास नाशिक जिल्ह्यातील भोजनालय चालवणाऱ्या महिलांवर केंद्रित असून, त्यांच्या आर्थिक स्थिती, व्यवसायाचे स्वरूप, उत्पन्न व खर्चाचे स्वरूप, बचत व कर्ज व्यवस्थापन, तसेच सामाजिक अडचणी आणि आर्थिक निर्णय क्षमता यांचा अभ्यास करतो. या संशोधनातून महिलांच्या व्यवसाय व आर्थिक सक्षमता वाढवण्यासाठी शासकीय तसेच सामाजिक स्तरावर उपयुक्त शिफारसी दिल्या जाऊ शकतात.

**महिला उदोजक व्यवसायाचा सामाजिक अभ्यास:**

समाजात महिलांचा सहभाग फक्त घरापुरता मर्यादित नाही, तर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही तीव्र वाढ होत आहे. महिला व्यवसायात फक्त उत्पन्नाचा स्रोत नाही, तर समाजातील महिलांच्या आत्मसन्मान, निर्णयक्षमता आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचा प्रतिक आहे.

महिला समाजात विविध बदल घडत आहेत. व्यवसाय सुरू करणाऱ्या महिलांचा सामाजिक अभ्यास केल्यास त्यांच्या कुटुंब, समाज आणि व्यवसायाशी संबंधित अडचणी, अपेक्षा व योगदान समजून घेता येते. सामाजिक अभ्यासाद्वारे महिलांच्या आर्थिक निर्णय क्षमता, व्यवसायातील अडचणी, समाजातील भूमिका आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचा अभ्यास करता येतो.

विशेषतः ग्रामीण आणि उपनगर भागातील महिला, जसे की नाशिक जिल्ह्यातील भोजनालय चालवणाऱ्या महिला, त्यांच्या व्यवसायात आर्थिक यश मिळवण्यासाठी तसेच सामाजिक स्तरावर सन्मान मिळवण्यासाठी संघर्ष करतात. या संघर्षांचे, अडचणींचे आणि यशाचे विश्लेषण करून महिला समाज्यातील सामाजिक योगदानाचे स्वरूप समजणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

1. नाशिक जिल्ह्यातील भोजनालय चालवणाऱ्या महिला उद्योजकांच्या व्यवसायामुळे त्यांचे उत्पन्न वाढले आहे, बचत व गुंतवणूक सुधारली आहे आणि कुटुंबाच्या आर्थिक निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग वाढला आहे.
2. व्यवसायामुळे महिलांचा समाजातील दर्जा, प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास वाढला असून, त्यांनी कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
3. महिला उद्योजकांना भांडवल मिळवण्यास, कर्ज घेण्यात, कामगार व्यवस्थापन आणि वेळेचे नियोजन यासंबंधी काही अडचणी भेडसावतात.

4. उपलब्ध सरकारी योजना पूर्णपणे कार्यरत नसल्याचे आढळले; योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळण्यासाठी जागरूकता व पोहोच सुधारण्याची आवश्यकता आहे.
5. महिलांचा व्यवसाय स्थानिक अर्थव्यवस्थेत योगदान देणे गरजेचे आहे त्यामुळे , रोजगारनिर्मिती वाढ करतो आणि इतर महिलांना उद्योजकतेकडे प्रवृत्त करण्यास प्रेरणा देतो.
6. संशोधनातून स्पष्ट झाले की, महिलांचा व्यवसाय सामाजिक व आर्थिक दृष्ट्या सक्षमीकरण साधतो.

**शिफारसी:**

1. महिला उद्योजकांसाठी आर्थिक सहाय्य व कर्ज योजना सुलभ कराव्यात, तसेच भांडवल उपलब्धता सुधारावी.
2. व्यवसाय व्यवस्थापन, विपणन, खाद्यपदार्थ गुणवत्ता आणि ग्राहक सेवा यासंबंधी प्रशिक्षण व कौशल्य विकासाचे कार्यक्रम आयोजित करावे.
3. महिला उद्योजकांसाठी उपलब्ध सरकारी योजना प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जागरूकता मोहिम राबवाव्यात.
4. समाजात महिला उद्योजकतेबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी जनजागृती करावी.
5. महिलांच्या व्यवसायातील अडचणी (भांडवल, कर्ज, कामगार व्यवस्थापन, वेळेचे नियोजन) दूर करण्यासाठी उपाययोजना सुचवाव्यात.

**समारोप:**

संशोधनातून स्पष्ट होते की, नाशिक जिल्ह्यातील भोजनालय चालवणाऱ्या महिला उद्योजकांचा व्यवसाय त्यांच्या जीवनावर सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण परिणाम करतो. या अभ्यासाद्वारे महिलांच्या उत्पन्नातील वाढ, बचत व गुंतवणुकीतील सुधारणा तसेच कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग यांचा अभ्यास करता येईल. महिला उद्योजकतेमुळे समाजातील प्रतिष्ठा, आत्मविश्वास आणि सामाजिक सक्षमीकरण सुधारते, तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेत त्यांचा योगदानही लक्षात येतो. तथापि, व्यवसाय चालवताना भांडवल, कर्ज, कामगार व्यवस्थापन व वेळेचे नियोजन यासंबंधी काही अडचणी अनुभवायला मिळतात, ज्यावर उपाययोजना करून व्यवसाय अधिक परिणामकारक केला जाऊ शकतो. या संशोधनाचा उद्देश महिला उद्योजकतेचा शास्त्रीय अभ्यास करून त्यांचे आर्थिक-सामाजिक स्थान स्पष्ट करणे, तसेच भविष्यातील धोरणनिर्मितीसाठी आणि महिला सक्षमीकरणासाठी सर्वांगीण मार्गदर्शन प्रदान करणे हा आहे.

तसेच प्रस्तावित अभ्यास महिला उद्योजकतेच्या विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण योगदान देईल, तसेच इतर महिलांना व्यवसायात उतरविण्यास प्रेरणा मिळेल.

**संदर्भसूची:**

1. उदोजक: मासिक जानेवारी 2021
2. देशमुख, आर. (२०१७). महिला उद्योजकता व सामाजिक बदल. पुणे: आधुनिक प्रकाशन.
3. पाटील, एस. (२०१८). सेवा क्षेत्रातील महिला उद्योजकता: स्थानिक अभ्यास. नाशिक: प्रबोधन प्रकाशन.
4. शिंदे, एल. (२०१९). भारतीय महिला उद्योजकता: आर्थिक व सामाजिक दृष्टिकोन. मुंबई: सिद्धार्थ प्रकाशन.
5. जर्नल लेख: कुलकर्णी, पी. (२०१८). “भोजनालय व्यवसायातील महिला उद्योजकतेचा अभ्यास.” इंडियन जर्नल ऑफ सोशल रिसर्च, 15(2), 45–60.